# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०१७ / श्रावण ९, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उद्योग व खनिकर्म मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |
| **(४)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५३**

---

### राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेतील वर्ग-३ व ४ या वर्गवारीतील कर्मचा-यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(१) * ९२२३० श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेत मागील १० वर्षांपासून वर्ग ३ व ४ मधील सुमारे २२०० कर्मचारी तासिका तत्वावर व अल्पशः वेतनावर काम करत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचा-यांनी नोकरीत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत माहे मार्च, २०१५ मध्ये आमरण उपोषण करुन उक्त मागण्यांचे निवेदन नाशिक आयुक्त कार्यालयास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त कर्मचा-यांना नोकरीत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात तासिका तत्वावरील नेमलेले शिक्षक कर्मचाऱ्यांची संख्या ११६९ व शिक्षकेतर/रोजंदारी कर्मचाऱ्यांची संख्या ११३९ अशी असून, एकूण २३०८ रोजंदारी/तासिका तत्वावर कर्मचारी नियुक्त आहेत व त्यांचे मानधनात दि.०७.०६.२०१७ च्या आदेशान्वये वाढ केली आहे.

(२) होय.

(३) शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये तासिका तत्वावरील विहित पात्रताधारक शिक्षक व मानधनावरील अधिक्षक यांना नियमित भरती प्रक्रियेद्वारे गुणवत्तेनुसार सामावून घेण्याची कार्यवाही विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील सिध्दनेर्ली आणि परिसरातील अतिरिक्त भारनियमन रद्द करण्याबाबत

**(२) * ८७३८१ श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील सिध्दनेर्ली आणि परिसरात महावितरणने अतिरिक्त भारनियमन केल्यामुळे शेतकऱ्यांची पिके पाण्याअभावी सुकून जात असल्याने भारनियमन रद्द करणेसाठी शेतकऱ्यांनी दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी संबंधित विभागाकडे तक्रारी करुनही भारनियमन रद्द करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भारनियमन त्वरीत रद्द करण्याबाबत शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भारनियमन रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) माहे एप्रिल, २०१७ मध्ये प्रचंड उष्णतेमुळे वीजेची मागणी मोठया प्रमाणात वाढली होती. त्यामुळे ४०० के.व्ही. तळंदगे अतिउच्चदाब (EHV) केंद्रातील आयसीटी (ICT) अतिभारीत (overload) होत असल्याने दिनांक १३.०४.२०१७ ते १५.०४.२०१७ या कालावधीमध्ये अतिउच्चदाब केंद्राकडून अतिरिक्त भारनियमन करण्यात आले होते.
(२) भारनियमन रद्द करण्याबाबत सदर परिसरातील शेतकऱ्यांनी शाखा कार्यालय, सिध्दनेर्ली यांच्याकडे दि. १३.०४.२०१७ रोजी निवेदन दिले होते.
(३) स्थानिक स्तरावर वीज मागणीचे व्यवस्थापन केल्यामुळे अतिउच्चदाब उपकेंद्राकडून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आल्यामुळे शेतीपंपाचे अतिरिक्त भारनियमन रद्द झाले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आदिवासी विकास महामंडळाच्या बँकेतील खात्यात रु. १० कोटीचा झालेला गैरव्यवहार**

**(३) * ८६०८९ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळाच्या नावे बनावट कागदपत्रे बनवून विभागाच्या राष्ट्रीयीकृत बँकेच्या खात्यात असलेल्या दहा कोटींच्या ठेवी परस्पर दुस-या बँकेत वर्ग करण्यात आल्याचे दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर प्रकरणी नाशिकमधील एका बँकेच्या शाखा व्यवस्थापकास मुंबई येथील कफ परेड पोलिसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(३) याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, सदर चौकशीमध्ये काय निदर्शनास आले, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे. दि.२७.०४.२०१७ रोजी सदर बाब निदर्शनास आली.

(२) हे खरे आहे.

(३) होय. यातील आरोपींनी आदिवासी विकास महामंडळाचे बनावट लेटरहेड व कागदपत्र तयार करून कॅनरा बँक, नरीमन पॉईट शाखा, मुंबई येथे महामंडळाच्या नावे खाते उघडले व सदर खात्यामध्ये आंध्र बँक, शाखा नाशिक येथील रक्कम जमा केली.त्यानुषंगाने महामंडळाने कफ परेड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली असुन सदर ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.याबाबत पुढील चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ,जि.ठाणे) येथे शासकीय निवासी आश्रमशाळा उभारण्याबाबत**

**(४) * ९२३९३ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ,जि.ठाणे) येथील सर्वे नं.६८ मधील जागेवर अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या मुला-मुलींसाठी शासकीय निवासी आश्रमशाळा उभारण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे यांनी त्यांच्या दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या अनुषंगाने आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रस्ताव आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचेकडे प्राप्त झाला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पवन ऊर्जानिर्मिती क्षेत्राकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष**

**(५) * ८५०४८ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवन ऊर्जानिर्मिती क्षेत्राकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने या क्षेत्राची वाढ होऊ शकली नाही याऊलट तामिळनाडू, आंध्रप्रदेश आणि कर्नाटकासारख्या राज्यांनी पवन ऊर्जेला मोठ्या प्रमाणात चालना दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पवन ऊर्जा क्षेत्राला सुविधा दिल्यास व त्यानुषंगाने निर्णय घेतल्यास साडेतीन हजार मेगावॅटचे प्रलंबित प्रकल्प वर्षभरात कार्यान्वित होणे शक्य आहे, असे इंडियन विंड टर्बाइन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे महासंचालक यांनी मत व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाने दिलेल्या साडेसात हजार मेगावॅट ऊर्जानिर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे तसेच प्रश्न भाग (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) केंद्र शासनाचे ७५०० मेगावॅट ऊर्जानिर्मितीचे उदिष्ट हे सौर ऊर्जेसंबधीचे आहे. राज्य शासनाने शासन निर्णय क्र. अपाऊ-२०१५/प्र.क्र.४९/ऊर्जा-७, दिनांक २०/७/२०१५ च्या नविन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत यापासून ऊर्जा

निर्मितीचे एकत्रित धोरणांतर्गत पवन ऊर्जा निर्मितीचे ५००० मे.वॅ. क्षमतेचे उद्दिष्ट पुढील ५ वर्षांकरिता निश्चित केलेले आहे. त्यातील १५०० मे.वॅ. आर.पी.ओ. नित्यनुतनशील ऊर्जा बंधन पूर्ण करण्याकरीता आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंधेरी (पूर्व) येथील मरोळ औद्योगिक वसाहतीमधील भूखंडाचा लिलाव न करता ते वितरित केल्याबाबत**

**(६) * ९०३१३ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (पूर्व) मरोळ औद्योगिक वसाहत येथील प्लॉट क्र . X -२२ व X - २२/१ हे राखीव भूखंड मे.जीएचव्ही हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. यांना लिलाव न करता पूर्वी वितरित केलेल्या भूखंडाच्या ऐवजी वितरित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंड हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्यालयाशेजारी असून त्यावर असलेल्या झोपडपट्टीचा पुनर्विकास करून भविष्यात सदर भूखंडाचा मुख्यालयासाठी उपयोग होईल याकरिता विकासकास इमारत बांधण्यास परवानगी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भूखंड लिलावाद्वारे वितरित केला असता तर जास्त दराने वितरित होऊन औद्योगिक महामंडळाचे व पर्यायाने शासनाचे नुकसान झाले नसते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, मरोळ औद्योगिक वसाहत यांना पत्राद्वारे विचारणा केली असता दिशाभूल करणारी माहिती दिल्याने व पुरातत्व विभागाकडून प्राप्त स्टॉप वर्क नोटीस दिनांक २१ सप्टेंबर, २०११ ची असताना पूर्वीच्या प्लॉट ऐवजी उपरोक्त प्लॉट (Re - locate) देण्याचा प्रस्ताव त्यापूर्वीच दिनांक २८ फेब्रुवारी, २०११ रोजी मा. उद्योगमंत्री यांचेकडे सादर केल्याबाबत पुनःश्च खुलासा मागविण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे अशंतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पॉकेट क्रमांक १ मधील भुखंड महामंडळाच्या मरोळ येथील औद्योगिक क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत करारानाम्यातील तरतुदीनुसार २२.५० टक्के पोटी महामंडळास प्राप्त झालेला भुखंड आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम चे कलम १५ (अ ) अंतर्गत तसेच प्रचलित नियमानुसार असलेल्या अधिकारात अदलाबदलाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) हे खरे नाही.

याबाबतची वस्तुस्थिती यापुर्वीच मा. लोक प्रतिनिधीना महोदयांना अवगत करण्यात आलेली आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने नियमबाहय पध्दतीने कर्ज मंजूर केल्याबाबत

**(७) * ९०२०६ श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबै बँकेच्या (मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक) संचालक मंडळाने नाबार्डची परवानगी न घेता तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे निर्बंध विचारात न घेता निव्वळ मालमत्ता मूल्यापेक्षा अधिक म्हणजे ३५० कोटी रुपयांचे कर्ज नियमबाहय पध्दतीने पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी मंजूर केल्याची बाब माहे जनू, २०१७ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बँकेच्या संचालक मंडळाच्या कारभाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही, हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाटण (जि.सातारा) येथील औद्योगिक क्षेत्र नव्याने कार्यान्वित करण्याबाबत**

**(८) * ८८७९० श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि. सातारा) येथील औद्योगिक क्षेत्रात मागील अनेक वर्षांपासून केवळ एक ते दोनच उद्योग सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण ३४ भूखंड असून या भूखंडामध्ये सुमारे १५० नवीन उद्योग सुरु करण्यास वाव असताना एकूण ३४ भूखंडांपैकी २७ भूखंडाचे वाटप करण्यात आले व त्यापैकी केवळ २ भूखंडामध्ये उद्योग सुरु असून उर्वरीत भूखंड सद्य:स्थितीत विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी वापराविना पडून असलेले २५ भूखंड तात्काळ खाली करुन याठिकाणी नवीन उद्योजकांना सदर भूखंडाचे वाटप करणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ व दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे उद्योगमंत्री यांचेकडे मागणी केली आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे नाही.

पाटण औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण १० भुखंडावर उत्पादन सुरु असून आरेखित केलेल्या एकूण ३५ भुखंडापैकी ३४ भुखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. विकास कालावधी शिल्लक असलेले भुखंड ६ असून अविकसित भुखंड १८ आहेत.

(३) व (४) हे खरे आहे.

अविकसित १८ भूखंडापैकी १५ भूखंड पंचनाम्याने ताब्यात घेतले असून उर्वरित ३ भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ताब्यात घेतलेल्या भूखंडाचे वाटप महामंडळाच्या धोरणानुसार करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षण शिष्यवृत्ती वाटपामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(९) * ८९८०२ श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.राज पुरोहित (कुलाबा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिष्यवृत्ती अपहाराची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने अतिरिक्त पोलीस महासंचालक यांच्या नेतृत्वाखाली माहे जानेवारी, २०१६ मध्ये स्थापन केलेल्या विशेष कृती पथकाने (एसआयटी) दिलेल्या अहवालाच्या आधारे ७२ संस्थांविरूध्द गुन्हे दाखल करण्याचे आदेश सामाजिक न्याय विभागाचे तत्कालीन सचिवांनी विभागीय आयुक्तांना दिले असतानाही केवळ २२ संस्था चालक आणि प्राचार्यांविरूध्द गुन्हे दाखल केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणात झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी दोषी असलेल्या सर्व संस्था चालक आणि प्राचार्यांविरूध्द गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या प्रकरणात झालेल्या गैरव्यवहाराची रक्कम संबधितांकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क वाटपामध्ये झालेल्या अनियमिततेच्या संदर्भात विशेष चौकशी पथकाने लेखा परीक्षणाच्या आधारे सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार या विभागाने एकूण ६८ दोषी संस्थांविरुध्द गुन्हा दाखल करण्याच्या आणि वसुलपात्र रक्कम वसूल करण्याच्या सूचना आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना दिलेल्या आहेत. २ संस्थांचा चौकशी अहवाल चौकशी पथकाने परस्पर आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना पाठविलेला असुन, त्यानुसार पुढील कार्यवाही संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्या मार्फत करण्यात येत आहे. उर्वरीत २ संस्था ह्या आदिवासी विभागाशी संबंधित असून, त्यासंबधातील कार्यवाही त्या विभागामार्फत करण्यात येत आहे.

संबंधित २२ संस्थाचालक आणि प्राचार्य यांचे विरुध्द पोलीसात दाखल झालेले गुन्हे हे विद्यार्थ्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दाखल झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील मागासवर्गीय वस्ती सुधारणांसाठी प्राप्त निधीचा वापर न केल्याबाबत

**(१०) * ८८३०७ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील मागासवर्गीय वस्ती सुधारणांसाठी मिळालेला सुमारे ३ कोटींचा निधी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विनावापर पडून असल्याचे नुकतेच माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी दलित वस्त्यांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी खर्च न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) सन २०१६-१७ मध्ये प्राप्त रु.१५ कोटी  निधीपैकी रु.१२.६७ कोटी निधी खर्च करण्यात आलेला असून, रु.२.३३ कोटी रक्कम या वर्षात मंजूर असलेली कामे पूर्ण झाल्यानंतर सदर कामाची देयके अदा करण्यासाठी राखून ठेवण्यात आलेला आहे.

संबधित अर्थिक वर्षासाठी मंजूर निधी लगतच्या अर्थिक वर्षाअखेर खर्च करण्याची तरतूद असल्याने सदर  निधी खर्च न होता पडून राहीला अशी वस्तुस्थिती नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील सौर उर्जेवरील पायलट प्रोजेक्टबाबत**

**(११) * ८८२१७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात  पायलट प्रोजेक्टच्या माध्यमातून सौर ऊर्जेचा विकास करून ग्रीन एनर्जी निर्माण करण्याचे धोरण शासनाकडून राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार वीज पुरवठा विभागाने रायगड जिल्हयात कृषीपंप, नळपाणी योजना यासाठी सौरऊर्जेचा वापर करण्याचा निर्णय घेऊन यासाठी पायलट प्रोजेक्ट राबविण्यास सुरूवात केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी दुर्गम भागातील असावा, त्याच्याकडे कमीत कमी ५ एकर जमीन असावी, शाश्वत पाण्याचा स्त्रोत असावा तसेच १५ हजार रूपयांची अनामत रक्कम आवश्यक असणे अशा प्रकारच्या जाचक अटींचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाने उक्त दिलेल्या निकषांमध्ये बसणारा एकही लाभार्थी नसल्याने रायगड जिल्हयात हा पायलट प्रोजेक्ट अयशस्वी ठरला असून शासनाने उक्त निकष शिथिल करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२)हे अंशत: खरे आहे.रायगड जिल्हयात अटल सौर कृषी पंप योजनेतर्गत सौर कृषी पंप आस्थापित करण्याबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(३) शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१६/प्र.क्र. ३१९/ऊर्जा-७ दि. ०५/११/२०१६ नुसार सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मिळण्यासाठी शासनाने पुढील निकषात जसे लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे क्षेत्र ५ एकर ऐवजी १० एकर करण्यात आले आहे व सौर कृषी पंप योजनेचा फायदा घेऊन ज्या गटांमध्ये /विहीरीवर सौर पंप दिला आहे तेथे सौर कृषीपंप आस्थापित झाल्याचा दिनांकानंतर पुढील १० वर्षानंतर सदर ठिकाणी मागणी केल्यास महावितरण मार्फत विद्युत जोडणी/पुरवठा देण्यात येईल असे अंशत: बदल केले आहेत.

(४) रायगड जिल्हयातील सिंचन विहिरी पाण्याचा शाश्वत स्त्रोत नाही म्हणून लाभार्थ्यांचे अर्ज भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा अलिबाग यांचेकडून अपात्र ठरल्यामुळे तसेच सौर कृषीपंपासाठी आवश्यक रक्कमेचा भरणा करण्यास लाभार्थी शेतकऱ्यांची इच्छा नसल्यामुळे अटल सौर कृषीपंप योजनेस रायगड जिल्हयात पुरेसा प्रतिसाद मिळालेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोयना (ता. पाटण, जि.सातारा) व कोळकेवाडी (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीत सामावून घेण्याबाबत**

**(१२) * ९०८०५ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना (ता.पाटण, जि.सातारा) व कोळकेवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीत सामावून घेण्याबाबतची मागणी दिनांक ७ जून २०१७ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे मुख्य अभियंता, कोयना जलविद्युत केंद्र, पोफळी (ता.चिपळूण) यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीत सामावून न घेण्याची कारणे काय आहेत तसेच प्रश्न भाग १ मधील मागणीच्या अनुषंगाने कोयना व कोळकेवाडी प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोयना व कोळकेवाडी (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) येथील कोणतीही स्थावर/ जंगम मालमत्ता महानिर्मिती कंपनीने संपादित केलेली नाही व सदरची मालमत्ता महानिर्मिती कंपनीच्या नावे सुध्दा नाही. त्यामुळे सदर प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीच्या सेवेत सामावून घेता येणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, चाकण टप्पा क्र.२ मधील वासूली व भांबोली येथील निवासी व व्यावसायिक भूखंडामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१३) * ९२३२२ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,चाकण टप्पा क्र.२ मधील वासूली व भांबोली येथील निवासी व व्यावसायिक भूखंडामध्ये गैरव्यवहार झाल्याची तक्रार दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास गटनेता पुणे जिल्हा परिषद यांनी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ चिंचवड,पुणे यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाकण टप्पा क्र .२ मधील वासूली व भांबोली या गावात शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत केल्याच्या मोबदल्यात निवासी भुखंड व १५ टक्के परतावा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वासुली व भांबोली या गावात निवासी भुखंडावर मोठ्या प्रमाणात व्यावसायिक बांधकामे करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

चाकण टप्पा क्र. २ मधील निवासी प्रकारच्या वापरासाठी वाटप करण्यात आलेल्या भूखंडावर निवासी प्रयोजनासाठीचे बांधकामाचे नकाशे मंजूर करण्यात आले आहेत. रहिवाशी प्रकारच्या भूखंडावरील काही भूखंडामध्ये रहिवाशी प्रकारच्या वापरासोबत अंशत: व्यावसायिक प्रकारचा वापर केल्याचे सर्वेक्षणात आढळून आले आहे. भूखंडधारकासोबत केलेल्या करारनाम्यातील तरतूदी तपासून नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गडचिरोली जिल्हयात चिरदायी रोजगार योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१४) * ८८६११ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात सन २०१३-१४ या वर्षात राबविण्यात आलेल्या आदिवासी चिरदायी रोजगार योजनेत गैरप्रकार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी समाजाची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी शासनाने २ कोटी रुपयांचा निधी विशेष केन्द्रीय सहाय्य योजने अंतर्गत उपलब्ध करुन प्रति लाभार्थी १० हजार रुपयांचे वाटप बचत गटाच्या माध्यमातुन करण्यात आले परंतु या योजनेत बनावट कागदपत्रे दाखवून रोजगाराच्या नावे अनुदान वाटप करुन खोटी देयके काढण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बचत गटांनी बनावट कागदपत्रे सादर करुन फसवणुक केली असल्याने योग्य लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेअंतर्गत आदिवासींना रोजगारासाठी दिलेल्या अनुदानात गैरव्यवहार करणा-या बचतगटांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार या प्रकरणी दोषी असणा-यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत सन २०१३-१४ करीता आदिवासींच्या आर्थिक उन्नती साधणेकरीता बचत गटांची स्थापना करणे व चिरदायी रोजगार मिळवून देणे या योजनेकरीता रू. २.०० कोटी निधी मंजूर करण्यात आले आहेत. सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सुचना दि. ०९/०७/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. यानुसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांना रू. १.०० कोटी व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अहेरी आणि भामरागड यांना प्रत्येकी रु. ५०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर योजनेची कार्यवाही नियोजन स्तरावर असून हा निधी प्रकल्प कार्यालय स्तरावर असल्याने या बाबत कुठलाही गैरव्यवहार झालेला नाही

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जांभिवली (ता.पनवेल, जि. रायगड) या ग्रामपंचायत क्षेत्रात मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(१५) * ८४९७३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादित केलेल्या जांभिवली (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत क्षेत्रात गावाचा रस्ता व पुरेसा पाणी पुरवठा

त्वरीत उपलब्ध करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये  वा त्यादरम्यान मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्र जाहीर होवून सुमारे ५० ते ६० वर्षानंतरही उक्त विभागात अद्यापपर्यंत कोणत्याही मुलभूत सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच गावातील सुमारे १५० वर्षापासून अस्तित्वात असलेल्या विहीरी भराव टाकून बंद केल्यामुळे  ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जांभिवली ग्रामपंचायत क्षेत्रात त्वरीत मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

अतिरिक्त पाताळगंगा क्षेत्रात महा- मंडळाने  सर्व पायाभुत सुविधा  पुरविल्या आहेत. जांभिवली व आदिवासी वाडी जांभिवली या गावाना पोहच रस्ता व बोअरवेलद्वारे पाणी पुरवठा इ. सुविधा  संबंधित विभागाने पुरविल्या आहेत. तसेच महामंडळाच्या संपादित क्षेत्राच्या ई- आराखडा विकसित करताना रस्त्याच्या हद्दीत विहिर येत असल्याने ती बुजविण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुटीबोरी औद्योगिक वसाहतीतून तब्बल १६४० कोटी रुपयांच्या प्रकल्पांनी घेतलेली माघार

**(१६) * ८८९३४  प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :**  सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१३ मध्ये आयोजित केलेल्या ॲडव्हान्टेज विदर्भ परिषदेअंतर्गत साडे अकरा कोटी रुपयांचे उद्योजकांशी सामंजस्य करार करण्यात आले होते, हे  खरे आहे काय,

(२) असल्यास, सामंजस्य करार झालेल्या नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहतीतून तब्बल १६४० कोटी रुपयांच्या प्रकल्पांनी माघार घेतली असून मेक इन इंडिया अंतर्गत कंपन्याही प्रकल्प राबविण्यास तयार नसल्याचे व गेल्या दोन वर्षात एकही नवीन उदयोग आला नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपन्यांनी प्रकल्प माघारी घेण्याची कारणे काय व आतापर्यंत किती कंपन्यांनी प्रकल्प माघारी घेतले आहेत तसेच सामंजस्य करारामध्ये कोणत्या अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या होत्या,

(४) असल्यास, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार उद्योगधंद्यांची वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय हे खरे आहे.

सन २०१३ मध्ये झालेल्या ॲडव्हान्टेज विदर्भ या गुंतवणुकदारांच्या परिषदेमध्ये रु.१४,७९४ कोटीचे एकूण २८ सामंजस्य करार उद्योजकांशी करण्यात आले.

(२) व (३) हे खरे नाही.

बुटीबोरी क्षेत्रात माघार घेतल्याचे कोणतेही प्रकरण अद्याप निदर्शनास आलेले नाही.

(४) बुटीबोरी क्षेत्रात प्रकल्पांनी माघार घेतल्याबाबतची बाब निदर्शनास आलेली नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात आलेली नाही. तथापि, विदर्भातील औद्योगिकरणास चालना देण्याच्या दृष्टीने सामुहिक प्रोत्साहन योजनेच्या माध्यमातून विदर्भातील उद्योगांना वाढीव प्रोत्साहने देण्याचे धोरण अवलंबविण्यात येत आहे. विदर्भातील उद्योगांना सद्यस्थितीत १००% ढोबळ मुल्यावर्धीत करावर आधारित प्रोत्साहने देवू केली आहेत.

वरीलप्रमाणे राज्य शासन उद्योग वाढीसाठी प्रयत्नशील आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चोपडा तालुक्यात (जि.जळगांव) शासकीय वसतीगृह व निवासी शाळा मंजूर करण्याबाबत

**(१७) * ९१५१५ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा तालुक्यात (जि.जळगांव) सामाजिक न्याय विभागाचे एकही शासकीय वसतीगृह व निवासी शाळा नसल्यामुळे तालुक्यात सामाजिक न्याय विभागाचे १ मुलांचे व १ मुलींचे शासकीय वसतीगृह व निवासी शाळा मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांच्याकडे पत्रव्यवहार करुन मागणी करुनही अदयापी कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सामाजिक न्याय विभागाचे १ मुलांचे व १ मुलींचे शासकीय वसतीगृह व निवासी शाळा मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) दि. ६/९/२०१६ रोजी आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचेकडून काही तालुक्यांच्या ठिकाणी मागासवर्गीय मुलामुलींचे वसतिगृह मंजूर करण्याबाबत पत्र शासनास प्राप्त झाले आहे. तथापि, शासनाच्या दि. ३०/९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये व दि. २०/१२/२०१६ रोजीच्या स्मरणपत्रान्वये आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना ज्या जिल्हा / तालुक्यांमध्ये वसतिगृहे व निवासी शाळा नाहीत, अशा जिल्हा/तालुक्याची सविस्तर माहितीसह परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापुर जिल्हयातील इचलकरंजी येथे सहकार न्यायालय सुरू करणेबाबत

**(१८) * ९०८३४ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्ह्यातील इचलकरंजी येथे सहकार न्यायालय सुरु करण्यास शासनाने ४ वर्षापुर्वी सहकार विभाग शासन निर्णय रा.ज.स.-१००/प्र.क्र.५३८/५स, दि.०५/०५/२०११ द्वारे मंजुरी देवून सुध्दा अद्याप या न्यायालयाचे कामकाज सुरू झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर न्यायालयासाठी १ न्यायाधिश, कनिष्ठ लघु लेखक, शिरस्तेदार, कनिष्ठ लिपीक व शिपाई अशी पदे मंजुर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर न्यायालयासाठी जागा व भाडे रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित करुन घेण्यात आली असून मंजुरीनंतर ६ वर्षांनंतरही हे न्यायालय अद्याप सुरु झाले नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर न्यायालय सुरु न होण्याची कारणे काय आहेत व न्यायालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी यांचेकडुन फर्निचरची सुविधा व सर्व खर्च पायाभूत बाबींची पूर्तता न झाल्यामुळे भाडेकरार झालेला नाही. न्यायालयामध्ये पायाभूत सुविधाबाबतचे रु.२२,६२,०००/- (रु.बावीस लाख बासष्ठ हजार फक्त) इतक्या रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक सहकार न्यायालय क्र.१ कोल्हापूर या कार्यालयाने मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केले आहे. प्रस्तावित न्यायालयाचे फर्निचर साठी रु.८,५०,०००/- इतक्या रकमेस इचलकरंजी नगरपरिषद सभा दि. ८.०५.२०१७ ने मंजुरी दिली असुन त्यासाठी वर्क ऑर्डर देणेची कार्यवाही नगर परिषदेकडुन सुरु आहे.

(५) नाही.

-----------------

## धामणंगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील वसतिगृहांचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * ८८८९७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणंगाव रेल्वे (जि.अमरावती) या तालुक्याच्या ठिकाणी आदिवासी मुलींचे १०० व मुलांचे १०० या क्षमतेच्या वसतिगृहांचा प्रस्ताव माहे दिनांक १२ जुलै, २०१६ मध्ये सादर केल्यानंतरही अद्यापही सदर प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर अद्याप निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) त्यानुसार सदर वसतीगृहे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) धामणगाव रेल्वे येथे नवीन वसतीगृह सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव अपर आयुक्त, अमरावती यांच्यामार्फत दि.२६.०७.२०१६ रोजी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना प्राप्त झाला होता.

अशा प्रस्तावांच्या अनुषंगाने नवीन वसतीगृहे मंजूर करण्याऐवजी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळू न शकलेल्या वाढीव २०,००० विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून इ.१२ वी नंतरच्या उच्च शिक्षणासाठी भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन घेण्याकरिता आर्थिक सहाय्य म्हणून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट रक्कम जमा करण्याबाबत दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये “पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना” सुरू करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषीपंपाच्या मीटरचे रिडींग न घेताच खाजगी एजन्सी गैरव्यवहार करीत असल्याबाबत

**(२०) * ८६३३१ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरणकडील २४ लाख कृषी पंपांना बसविण्यात आलेल्या वीज मीटर्सपैकी १४ लाख कृषी पंपांच्या मीटरचे रीडिंग न घेताच खाजगी एजन्सी सरासरी रीडिंग महावितरणला पाठवून वर्षाला ४ ते ५ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार सदर प्रकरणात रीडिंग घेणा-या एजन्सीचे अधिकारी, कर्मचारी आणि महावितरणचे संबंधित अधिकारी या दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) राज्यातील एकूण २५.८० लक्ष कृषी ग्राहकांचे साधारणपणे ८०% पर्यंत सामान्य मीटर वाचन घेण्यात येत असून नादुरुस्त मीटरचे वाचन व सरासरी मीटर वाचनाचे प्रमाण साधारणपणे २०% एवढे आहे. चुकीच्या मीटर वाचनासाठी महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे मीटर वाचन दराच्या ५० पट दंडाची तरतूद असून त्यानुसार मीटर वाचन एजन्सीवर कंपनीकडून कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मुलींसाठी ५० वसतीगृहे उभारण्याबाबत

**(२१) * ८९१०८ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलींसाठी ५० वसतीगृहे उभारणे तसेच राज्यातील वृध्दाश्रमांना अनुदान सुरु करण्याचे आश्वासन राज्याचे मा. समाजकल्याण राज्यमंत्री महोदयांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सामाजिक न्याय विभागामार्फत दि.१६ डिसेंबर, २०१५ च्या शासननिर्णयान्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त राज्यात मागासवर्गीय मुलींसाठी नवीन ५० शासकीय वसतीगृहे सुरू करण्यात आली आहेत.

तसेच वृध्दापकाळ चांगल्यारितीने घालवता यावा याकरिता मातोश्री वृध्दाश्रम हि योजना स्वयंसेवी संस्थेमार्फत अनुदान तत्वावर राबविण्यात येते. या योजनेंतर्गत एकूण ३९ मान्यताप्राप्त अनुदानित वृध्दाश्रम कार्यरत आहेत. त्यामधील प्रवेशिताना दरडोई रू. ९००/- दरमहा परिरक्षण अनुदान देण्यात येते. तसेच एकूण ३१ मातोश्री वृध्दाश्रमास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यांना सदयस्थितीत कोणतेही अनुदान देण्यात येत नाही. सदर मातोश्री वृध्दाश्रमांना अनुदान सुरू करण्याबाबत प्रस्ताव मा. मंत्री मंडळास सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिराळा तालुक्यातील (जि. सांगली) तडवळे, ऐळापूर या ठिकाणी विद्युत उपकेंद्रे उभारण्याबाबत

**(२२) * ८८६०५ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा तालुक्यामध्ये (जि. सांगली) तडवळे, ऐळापूर या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाची २ विद्युत उपकेंद्रे नव्याने मंजुर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपकेंद्रांच्या उभारणीसाठी शासनाने जागेचा ताबा घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भाग डोंगरी तालुक्याचा असल्याने या ठिकाणी विद्युत उपकेंद्र उभारण्याची आवश्यकता विचारात घेता याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत शिराळा तालुक्यातील तळवडे व येळापूर-गवळेवाडी येथे ३३/११ के.व्ही.चे प्रत्येकी एक उपकेंद्र मंजूर आहे.

(२) तळवडे येथील उपकेंद्राकरिता दिनांक ०८.११.२०१६ रोजी खाजगी जागा व येळापूर गवळेवाडी येथील उपकेंद्राकरिता दिनांक ०९.११.२०१६ रोजी शासकीय जागा महावितरण कंपनीने ताब्यात घेतली आहे.

(३) दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्याेती योजना (DDUGJY Part-१) अंतर्गत महावितरण कंपनीमार्फत निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दोन्ही उपकेंद्राचे काम करणेकरिता दिनांक २.०३.२०१७ रोजी संबंधित कंत्राटदारास कार्यादेश (LoA) दिलेले असून उपकेंद्रांचे काम सुरु करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औराद (शहा) (ता.निलंगा जि.लातूर) येथील चंद्रसागर बहुउददेशीय सेवाभावी संस्थेस शाळा हस्तांतरणात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(२३) * ९११२४ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रसागर बहुउददेशीय सेवाभावी संस्था, औराद (शहा) (ता.निलंगा जि.लातूर) या संस्थेस शाळा हस्तांतरणात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत दिनांक २९ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.सामाजिक न्याय व विशेष सहाय यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.मंत्रीमहोदयांनी दिनांक २ डिसेंबर, २०१५ रोजी.मा.आयुक्त, अपंग कल्याण, आयुक्तालय पुणे, तसेच प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांना उक्त शाळेची सखोल चौकशी करून शासनास त्वरित अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनास अहवाल प्राप्त झाला असल्यास अहवालात नमूद दोषी शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी झालेल्या अनियमिततेस जबाबदार अधिका-यांवर कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास झाला असून त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधीत दोषी शाळांवर कारवाई करण्यासंदर्भात तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बारवी धरण (जि. ठाणे) या प्रकल्पातील बाधितांना शासनाच्या नोकऱ्यांमध्ये सामावून न घेतल्याबाबत**

**(२४) * ९०००५ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बारवी धरण (जि. ठाणे ) या प्रकल्पातील बाधितांना शासनाच्या नोकऱ्यांमध्ये सामावून घेण्याचे निर्देश मा. उद्योगमंत्री व मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक ०९ मे,२०१७ रोजी दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बारवी धरणग्रस्तांना शासनाच्या नोकऱ्यांमध्ये समाविष्ट करून घेण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व घेण्यात येत आहे, तसेच अद्यापपर्यंत किती जणांना नोकऱ्यांमध्ये समाविष्ट करून घेण्यात आले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय हे खरे आहे,
सदर बाब धोरणात्मक असल्याने मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करण्याची प्रकिया नगर विकास विभागामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्हा परिषद कृषि विभागात राबविण्यात येणारे सौर उर्जा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) * ८६८९४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात शासनाच्या अपारंपारिक ऊर्जा विकास कार्यक्रमातंर्गत जिल्हा परिषद कृषि विभागात राबविण्यात येणारे सौर उर्जा प्रकल्प शासनाच्या

उदासिन धोरणामुळे अद्याप प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांना निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार सौर उर्जा प्रकल्प पुन:श्च कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हिंगोली जिल्हयात जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी करण्यासाठी दि. १७/१२/२०१६ ते ३१/१२/२०१६ पर्यंत ही निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. तथापि ११/१/२०१७ पासून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता सूरू झाल्याने पुरवठा आदेश देता आले नाहीत. सौर ऊर्जा प्रकल्प पुनश्च कार्यान्वित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे कौठोली (ता.भडगांव, जि.जळगांव) येथील १३२ केव्ही उपकेंद्राच्या कामाबाबत**

**(२६) * ९१९८८ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कौठोली (ता.भडगांव, जि. जळगांव) येथील १३२ केव्ही उपकेंद्राच्या कामास सन २०१६-१७ या वर्षात निधी उपलब्ध करुन सदर काम त्वरित सुरु करण्याबाबत मा. ऊर्जामंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर मा. ऊर्जामंत्री यांनी श्री. मित्तल, एमडी यांना नव्याने बैठक घेऊन या कामास त्वरित मंजूरी देऊन शासनास अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही या संदर्भात कोणतीही बैठक घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) सदरहू बैठक घेतली असल्यास, त्यात कोणता निर्णय घेण्यात आला आहे, तसेच सदर अहवाल शासनास सादर केला आहे काय, शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) दिनांक ०४.०१.२०१७ रोजी मा.लोकप्रतिनिधी तसेच महापारेषण व महावितरण कंपनीच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची बैठक झाली.
(४) सदर बैठकीस अनुसरुन मौ.कौठाली येथे १३२ के.व्ही. उपकेंद्रा ऐवजी ३३ के.व्ही. स्वीचिंग उपकेंद्र उभारण्याची शक्यता पडताळून पाहण्याबाबत महापारेषण कंपनीने महावितरण कंपनीस दिनांक १८.०३.२०१७ च्या पत्रान्वये कळविले होते. तसेच विद्यमान ३३ के.व्ही. प्रणालीचे सक्षमीकरण केल्यास विद्युत दाबात सुधारणा व स्थिर विद्युत पुरवठा होऊ शकेल असेही महावितरण कंपनीस कळविले होते.तदनंतर दिनांक २४.०३.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत महापारेषण व महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना संयुक्त पाहणी करण्याबाबत निर्देश दिले होते. सदर निर्देशानुसार दिनांक १२.०५.२०१७ रोजी दोन्ही कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त पाहणीनंतर नाशिक परिमंडळ कार्यालयात झालेल्या बैठकीत, कौठाली येथे ३३ के.व्ही. स्विचिंग उपकेद्र उभारण्याची शक्यता पडताळून पहाण्याचे ठरले.

-----------------

## नाशिक जिल्हा बँकेने हजारो शेतकऱ्यांची खाती गोठविल्याबाबत

**(२७) * ८५१३९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ६० हजार शेतकऱ्यांची बँक खाती कर्जाशी लिंक करुन घेतल्याने खाते गोठविल्यात जमा असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर असलेली २५ ते ५० हजारांची शिल्लक रक्कम शेतकऱ्यांना काढता न आल्याने शेतकऱ्यांच्या चालू खात्यातील रक्कम आणि त्याच्या बँकेतील मुदत ठेवी असे सुमारे १६५ कोटींचे व्यवहार ठप्प झाल्याची बाब दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी संचालक आणि शेतकरी यांच्यात झालेल्या बैठकीत निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्हा बँकेने तब्बल १०७५ कार्यकारी सोसायट्यांचा कर्जपुरवठा अचानक थांबविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित बँकेवर व संचालक मंडळावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालेगांव (ता. जि.नाशिक) येथे होत असलेले भारनियमन**

**(२८) * ८८२५३ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे होत असलेले भारनियमन चुकीचे असून १२ केव्ही आणि ३३ केव्हीच्या वाहिन्या या आकाराने आणि अतिदाबाच्या असलेल्या आवश्यकतेपेक्षा कमी असल्यामुळे वीज वाया जात असून वाहिन्या वारंवार तुटत असल्याने वीज वितरणास बाधा निर्माण होत असल्याचेही माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तांत्रिक अणि व्यावसायिक वीजेच्या हानीचे ऑडिटही बरोबर होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भारनियमनामुळे मालेगाव येथील यंत्रमाग धारकांनी रात्रपाळी बंद केली असल्याने यंत्रमागधारकांना नुकसान होत असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) सध्या वीजेच्या मागणीनुसार वीजेची उपलब्धता असल्यामुळे राज्यात कुठेही भारनियमन करण्यात येत नाही. परंतु वीजेच्या उपलब्धतेत अचानक कमतरता आल्यास तसेच इतर तांत्रिक कारणासाठी आणीबाणीच्या परिस्थितीत गरजेनुसार वीज नियामक आयोगाने ठरविलेल्या मानकानुसार वाहिन्यांच्या वीज वितरण व वाणिज्यिक हानी गटाप्रमाणे भारनियमन केले जाते. मालेगाव शहरातील ११ केव्ही आणि ३३ केव्ही वाहिन्यां योग्य क्षमतेच्या असल्यामुळे वीजेची अनावश्यक हानी होत नाही तसेच शहरी भागातील सर्व वाहिन्यांचे एनर्जी ऑडीट दर महिन्यात करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडहिंग्लज तालुक्यात (जि.कोल्हापूर) कृषि पंपाच्या जोडण्या प्रलंबित असल्याबाबत

**(२९) * ८७५९४ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज तालुक्यात (जि.कोल्हापूर) वीज जोडण्यांसाठी अनामत रक्कम भरुनही कृषिपंपाच्या वीज जोडण्या मोठया प्रमाणात प्रलंबित असून विद्‌युत जोडण्या लवकरात लवकर देण्यात याव्यात अशी मागणी मा.उर्जा मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच मौजे पिळणी (ता.चंदगड,जि.कोल्हापूर) येथील कृषी पंपाच्या ट्रान्सफॉर्मरमध्ये मोठया प्रमाणात जोडण्या असल्याने सतत बिघाड होत असल्याचेही माहे एप्रिल,२०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कृषी पंपाच्या ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड होऊ नये याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच गडहिंग्लज तालुक्यातील कृषिपंपाच्या वीज जोडण्या प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, सदरहू वीज जोडण्या त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे पिळणी येथील कृषीपंपाच्या ट्रान्सफॉर्मरच्या डिस्ट्रीब्युशन बॉक्समधील फ्यूज जाण्याचे प्रमाण जास्त होते. त्याठिकाणी १०० के.व्ही.ए. चा अतिरिक्त टान्सफॉर्मर बसविण्याबाबत महावितरण कंपनीमार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुक्यामध्ये मार्च २०१६ अखेर २०८ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सन २०१६-१७ मध्ये सदर तालुक्यात ३६६ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून मार्च २०१७ अखेर १५१ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. सन २०१७-१८ मध्ये मे, २०१७ अखेर ७० कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून मे, २०१७ अखेर १४० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत व त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाच्या निवासी शाळा, वसतीगृहे आणि रमाई आवास योजनेत साहित्य खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(३०) * ८४८४१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर**

**काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या निवासी शाळा, वसतीगृहे आणि रमाई आवास योजनेत २०११ ते २०१४ या कालावधीत विविध साहित्य खरेदीत ४०० कोटी रूपयाचा गैरव्यवहार झाल्याचे महालेखाकार कार्यालय आणि विधीमंडळाची लोकलेखा समिती व पंचायत राज समितीच्या तपासणी अहवालात दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबधितावर कारवाई होत नसल्याबाबत विधीमंडळाची लोकलेखा समितीने तीव्र नाराजी व्यक्त करून एक महिन्याच्या आत कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील मोसंबीचे दर निम्म्याने घटल्याने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(३१) * ८९०२८ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात सुमारे ४३ हजार हेक्टरवर मोसंबीच्या बागा असून, प्रति टन १५ हजार रुपये मिळणारा दर यावर्षी प्रतिटन ३ ते ४ हजारावर घसरल्याने ७० टक्के मोसंबी उत्पादकांचा उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोटाबंदीमुळे बागवानांनी बागांच्या सौद्याकडे केलेले दुर्लक्ष, त्यानंतर कमी झालेले दर व सततच्या दुष्काळामुळे मोसंबी उत्पादकांचे फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मोसंबी फळ बागायतदारांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१६-१७ मध्ये मराठवाडयात मोसंबी लागवड क्षेत्र ३९.७३ हजार हेक्टर आहे. माहे ऑक्टोबर ते एप्रिल पर्यंत मोसंबीचा सरासरी दर प्रति टन रूपये ३६७७० ते २३३६० पर्यंत होता. परंतु ऑक्टोबर ते एप्रिलच्या दरम्यान होणाऱ्या आवकेच्या तुलनेत मे महिन्यामध्ये आवकमध्ये घट झाली . मे महिन्यामध्ये आवक ८५८३५ क्विंटल इतकी होती तर सरासरी दर हे प्रति टन रूपये २१६४० इतके होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## बुलढाणा व सोलापूर जिल्हयात कृषि पंप वीज जोडणीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३२) * ८७८३१ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात कृषि पंप वीज जोडणीचे २२६४ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ४० हजार शेतक-यांच्या कृषी पंपाना वीज जोडणीसाठीचा सुमारे १२५ कोटी रुपयांचा प्रस्ताव राज्य वीज मंडळाने शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील कृषि पंप वीज जोडणीचे प्रस्ताव प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत तसेच प्रश्न भाग (२) च्या संदर्भात शासनाने अद्यापपर्यंत कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदरच्या वीज जोडणीची कामे केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) बुलढाणा जिल्हयात विविध योजनांतर्गत मे, २०१७ अखेर २१९२ कृषिपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून मे २०१७ अखेर ९५२० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत व त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२), (३) व (४) सन २०१७-१८ मध्ये सोलापूर जिल्हयात मे, २०१७ अखेर २८६ कृषिपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे. मे २०१७ अखेर ११,८८५ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित असून विविध योजनांतर्गत कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## घणसोलीगाव, तळवली गाव, गोठवली गाव, राबडा गाव या परिसरात स्वतंत्र उपकेंद्र उभारण्याबाबत

**(३३) * ८५३२० श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घणसोलीगाव, तळवली गाव, गोठवली गाव, राबडा गाव या परिसरात वारंवार वीज खंडित होण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील परिसरातील वीजेची समस्या दूर करण्यासाठी स्वतंत्र उपकेंद्र उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री महोदयांकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदरील परिसरात स्वतंत्र उपकेंद्र कधीपर्यंत सुरु करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) घणसोली गांव व त्यांचा आजूबाजूचा परिसर जलद गतीने विकसित होत असून वीजेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. घणसोली फिडरची लांबी अंदाजे १४ किमी असून त्यावर सध्या अतिरिक्त लोड असल्यामुळे तळवली भागातील ग्राहकांना खंडीत होणाऱ्या वीज पुरवठयाच्या समस्येस सामोरे जावे लागत आहे.

(२) अशा आशयाचे स्थानिक प्रतिनिधीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) घणसोली परिसरात स्वतंत्र उपकेंद्र उभारण्याबाबत लागणाऱ्या जागेची मागणी सिडको कार्यालयास महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयाद्वारे करण्यात आलेली आहे. सदरची जागा प्राप्त होताच स्वतंत्र उपकेंद्र प्रस्तावित करण्यात येईल.

-----------------

## धुळे जिल्हयातील १०८ वसतिगृहांना दोन वर्षापासून अनुदान मिळाले नसल्याबाबत

**(३४) * ९०७५१ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील १०८ वसतिगृहांना तब्बल दोन वर्षापासून अनुदान मिळाले नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृह चालकांनी ५० वर्षांपर्यंतचे रेकॉर्ड सादर करुनही जुन्या ४० वसतिगृहांकडे मुळ मंजुरी प्रमाणपत्राची मागणी केल्याने पाच हजार विद्यार्थ्यांचे भवितव्य अडचणीत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अनुदान देण्यास दूर्लक्ष करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यारत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र. शिक्षण/ अनुवगृहे/अनुदान वाटप/का-५ब/१०३४ दिनांक ३०/३/२०१७ अन्वये ज्या अनुदानित वसतिगृहांकडे मूळ मान्यतेचे आदेश असतील अशाच वसतिगृहांना नियमानुसार अनुदान अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी व ज्या अनुदानित वसतिगृहांकडे मूळ मान्यतेचे आदेश नाहीत अशा वसतिगृहांच्या प्रकरणी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नाशिक यांचेकडे सुनावणी घेऊन अनुदानित वसतिगृहांच्या वैधतेबाबत स्वयंस्पष्ट शिफारशीसह अहवाल आयुक्तालयास सादर करावा, असे आदेश दिले आहेत. धुळे जिल्हयातील २५ अनुदानित वसतिगृहांकडे मूळ मान्यतेचे आदेश नाहीत. सदर २५ वसतिगृहांची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे यांचेकडे सुनावणी घेण्यात आली असून अहवाल आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवालावर आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घोरपडवाडी (ता.राहुरी, जि.अहमदनगर) येथील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबास अर्थिक मदत देण्याबाबत

**(३५) * ८९१३० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, मागील दोन वर्षापासून, कांदा पिकाला कमी भाव मिळत असल्याने घोरपडवाडी (ता.राहुरी,जि.अहमदनगर) येथील देवराव रखमा शेंडगे यांनी मुळा

नदीपात्रातील डिग्रस बंधा-यात उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना दिनांक ८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घटनेची चौकशी करुन मृत शेतक-यांच्या कुटुंबियांस त्वरीत आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, शासनाने कांदा उत्पादक शेतक-यांना प्रति किलो एक रुपयावरुन किमान तीन रुपये अनुदान रक्कम वाढवून तसेच दिनांक २ ऑगस्ट, २०१६ व २०१७ या वर्षातील, कांदा उत्पादक शेतक-यांना, अनुदान रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

पोलीस निरीक्षक, राहूरी पोलीस स्टेशन यांचे कडील दिनांक १२/७/२०१७ रोजीचे पत्रानुसार देवराव रखमा शेंडगे यांचा अपघाती मृत्यु झालेला आहे. तसेच मयतांचे नावावर कोणत्याही बँकेचे कर्ज व विकास सोसायटीचे कर्ज नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) राज्यातील ज्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जुलै,२०१६ व ऑगस्ट,२०१६ या कालावधीत कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केली आहे.त्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये १००/- व २०० क्विंटल प्रति शेतकरी अनुदान देण्यासाठी रुपये ४३.४८ कोटी निधी शासन निर्णय, दिनांक ३/७/२०१७ अन्वये आकस्मिकता निधीमधुन उपलब्ध करुन वितरीत करण्यात आला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील ४५६४९ पात्र लाभार्थ्यांना रुपये १७.९९ कोटी अनुदान वितरित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (जि. बुलडाणा) येथील नाफेडच्या तूर खरेदी केंद्रातील तूरीचे पावसात भिजल्याने झालेले नुकसान

**(३६)** * ८५०९८ **श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि. बुलडाणा) येथील नाफेडच्या तूर खरेदी केंद्रावर पावसामुळे भिजल्याने शेकडो क्विंटल तूरीचे नुकसान झाल्याची बाब दिनांक १२ जून, २०१७ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलडाणा जिल्ह्यातील नाफेड मार्फत सुरू करण्यात आलेल्या अनेक तूर खरेदी केंद्रावर आवश्यक त्या सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात आल्या नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, याप्रकरणी जबाबदार असणा-या अधिका-यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) चिखली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये किंमत स्थिरता निधी, Price Support Scheme व राज्यशासनाच्या बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत खरेदी केलेल्या तूरीपैकी ८७९.५० क्विंटल तूर, अचानक आलेल्या वादळी पावसामुळे थोड्याफार प्रमाणात ओली झाली होती. तूर खरेदी नियत्रंण समितीने केलेल्या प्रत्यक्ष पाहणी दरम्यान पोत्यातील तूरीचे कोणत्याही प्रकारे नुकसान झालेले दिसून आलेले नाही.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करड तालुक्यातील (जि.सातारा) महावितरणाच्या प्रलंबित कामांना निधी उपलब्ध करणेबाबत

**(३७) * ८७५२४ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड तालुक्यातील (जि.सातारा) महावितरणच्या प्रलंबित कामांना निधी संमत करुन कामे पूर्ण करण्याची मागणी मा.उर्जा मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे मसूर (ता.कराड, जि.सातारा) येथील शेतकऱ्यांच्या कवठे हद्दीमधील कृषि पंपाना विद्युत जोडणी जोडून मिळणेबाबत व तेथे नवीन राहित्र बसविण्याची मागणी मा.उर्जा मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ मधील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली  वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) कामथी व इंदोली गावातील नळ पाणीपुरवठा योजनांना गावठाण वाहीनीवरुन २४ तास विद्युत पुरवठा दिला जातो, उर्वरित नळ पाणीपुरवठा योजनांना गावठाण फिडरवरुन विद्युत पुरवठा तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रलंबित कृषीपंप जोडण्या, जिल्हा सर्वसाधारण वार्षिक योजना २०१७-१८ अंतर्गत निधी प्राप्त झाल्यावर देण्यात येणार आहेत. दोन गाळयांमध्ये नवीन पोल टाकणे याबाबत देखभाल व दुरुस्ती योजनेअंतर्गत कामे पूर्ण करणेत आली आहेत तसेच उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. पाडळी हेळगाव ता. कराड या गावातील कृषीपंपाना योग्य दाबाने विद्युत पुरवठा देणेकरीता मौजे कालगांव ता. कराड येथे पायाभूत आराखडा - २ योजनेअंतर्गत नवीन उपकेंद्रे मंजूर असून त्यासाठी शासकीय नियमानुसार जमिन अधिग्रहीत करणेत आलेली आहे. मौजे मसूर ता. कराड जि. सातारा येथील कवठे हद्दीमधील ४ कृषीपंपाना विद्युत कनेक्शन जोडून मिळणेबाबत व तेथे नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी केली आहे. त्यांना विविध योजनामधून वीज जोडणी देण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंगरूळपीर (जि.वाशिम) येथील वखार महामंडळात अपहार झाल्याबाबत**

**(३८) * ९१४१२ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य वखार महामंडळाच्या गोदामात भाड्याने धान्य ठेवतांना ५० टक्के सवलतीचा लाभ देण्यासाठी व्यापा-यांची तूर, शेतक-यांच्या नावे  ठेऊन २० लाखापेक्षा अधिक रूपयांचा अपहार केल्याने मंगरूळपीर (जि.वाशिम) येथील तत्कालिन भांडार व्यवस्थापक एम.टी.बुंदिले यांना माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान बडतर्फ करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. बुंदिले यांच्यावर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करून सदर भांडार व्यवस्थापकाकडून सदर रक्कमेची वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) श्री. एम. टी. बुंदेले, तत्कालीन कनिष्ठ साठा अधिक्षक व केंद्र प्रमुख मंगरुळपीर, जि.वाशिम यांना दि.१८.०३.२०१७ रोजी बडतर्फ करण्यात आले आहे, हे खरे आहे.

(२) श्री.बुंदेले यांच्यावर गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, त्यांच्यावर महाराष्ट्र स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशन (स्टाफ) सर्व्हीस रेग्युलेशन मधील ७५(१) (b) (xi) नुसार बडतर्फीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) श्री.एम.टी. बुंदेले यांना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या सेवेतून बडतर्फ करतांना महामंडळाच्या झालेल्या आर्थिक नुकसानीपोटी, त्यांना देय असलेल्या रक्कमेतून रु.१३,९०,०७१/- इतक्या रक्कमेची वसुली करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रु.६,७७,३२२/- ची वसुली करणेबाबत विमा कंपनीकडे दावा दाखल करुन व दिवाणी दावा दाखल करुन वसुली करण्यासाठी महामंडळाकडून कार्यवाही चालू आहे.

(४) श्री. बुंदेले यांच्याकडून रु.१३,९०,०७१/- इतक्या रक्कमेची वसुली करण्यात आली आहे. श्री. बुंदेले यांना बडतर्फ केल्यानंतर त्यांच्याकडून महामंडळाचे झालेले नुकसान त्यांच्या देय रक्कमेतून वसुल करण्यात आलेले असून, उर्वरित रक्कम विमा कंपनीकडून तसेच, दिवाणी दावा दाखल करुन वसुल करणेबाबत महामंडळाकडून कार्यवाही चालू आहे.

-----------------

**पाटण (जि.सातारा) या डोंगरी तालुक्यातील प्रलंबित विद्युत विकासाच्या कामांना निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(३९) * ८८८०९ श्री.शंभूराज देसाई (पाटण) : तारांकित प्रश्न क्रमांक ६६१६८ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) या डोंगरी तालुक्यातील विद्युत विकासाच्या प्रलंबित कामांचा सुमारे १८ कोटी रुपयांचा आराखडा महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या सातारा विभागाचे अधीक्षक अभियंता यांनी तयार करून तो राज्य शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात राज्य शासनाकडून या आराखड्याला मंजुरी देवून आवश्यक निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने पाटण या डोंगरी भागातील प्रलंबित विद्युत विकासाच्या असलेल्या अडचणी लक्षात घेऊन या आराखड्याला तात्काळ मान्यता देण्यासंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, निधी उपलबध करुन न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यामध्ये डोंगरी भागातील विद्युत विकास कामाकरिता रु.११.३५/- कोटीचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडून प्राप्त झाला आहे. सदर कामाकरीता आवश्यक निधी मिळण्यासाठी डोंगरी विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्हयात आर्णी, नेर व पांढरकवडा येथे मंजूर झालेले औद्योगिक क्षेत्र त्वरीत कार्यरत करण्याबाबत**

**(४०) * ८८६२४ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात आर्णी, नेर व पांढरकवडा येथे मंजूर झालेले औद्योगिक क्षेत्र त्वरीत कार्यरत करण्यासाठी या ठिकाणी भूखंडाचे हस्तांतरण होऊन उद्योग

सुरू होण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्णी येथे एमआयडीसी मंजूर असून भूखंड हस्तांतरण झाले नसल्याने उद्योग सुरू करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू एमआयडीसींच्या अडचणी त्वरीत सोडवून उद्योग सुरू करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) आर्णी येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेसाठी मौजे जवळ येथील अधिसूचित करण्यात आलेली १७३.९१ हे. आर सरकारी जमीन महसूल विभागाकडून महामंडळास हस्तांतरित झालेली नाही. भूसंपादन करण्याची प्रकिया सुरु आहे. भूसंपादन प्रक्रिया झाल्यानंतर क्षेत्र विकसित करुन भूखंड वितरित करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयात खावटी कर्ज योजना बंद केल्याबाबत**

**(४१) * ९२२८१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील आदिवासी लोकांना देण्यात येणारी खावटी कर्ज योजना सन २०१३-२०१४ या कालावधीपासून बंद केली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आदिवासी भागात सावकार व व्यापाऱ्यांकडून होणारी आदिवासी लोकांची पिळवणूक थांबविण्यासाठी व आदिवासी लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सन १९७८ पासून खावटी कर्ज योजना सुरू केली होती,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात सदर योजना बंद असल्याने माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत आदिवासी लोकांना रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे आदिवासींना आपली उपजिवीका करणे कठिण होत असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त जिल्ह्यातील आदिवासींना बंद केलेली खावटी कर्ज योजना तातडीने सुरू करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही. सन २०१३-१४ पर्यंत दारिद्र्य रेषेखालील पात्र लाभधारकांना खावटी कर्ज वाटप करण्यात आले होते. सन २०१४-१५ मध्ये पुर्वीच्या लाभार्थ्यांनी कर्जाची परतफेड केलेली नसल्याने खावटी कर्जाचे वाटप झाले नाही.

(२) जुन ते सप्टेंबर या कालावधीत रोजगार उपलब्ध होत नाही म्हणून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी (अल्प भुधारक, भुमीहीन व शेतमजुर) यांना आर्थिक अडचण निर्माण होऊ नये म्हणून सन १९७८ पासुन खावटी कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे.

(३) व (४) महाराष्ट्र राज्य आदिवासी सहकारी विकास महामंडळ यांनी सन २०१७-१८ साठीचा प्रस्ताव सादर केलेला असून त्यावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**गाडगे नगर, अमरावती येथील वसतीगृहातील मुलीचा झालेला मृत्यू**

**(४२) * ८८९४९ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहराच्या गाडगेनगर येथील आदिवासी मुलींच्या वसतीगृहात राहणाऱ्या एका विद्यार्थिनीचा दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी आकस्मिक मृत्यू झाला असून वसतीगृह अधीक्षक व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याचे आदिवासी संघटनेचे म्हणणे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थिनीला तीन दिवसांपासून पोटदुखी व उलट्याचा त्रास होत असतानाही तिला रुग्णालयात नेण्याऐवजी वसतीगृह अधिक्षकांनी तिच्यावर स्वत:च औषधोपचार केले व तिची प्रकृती खालावल्यानंतर तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले तथापि उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे तसेच आदिवासी वसतिगृहातील मुलींच्या मृत्यूचे वाढते प्रमाण पाहता याप्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अशा प्रकारची घटना घडली असल्याने सदर वसतिगृहाच्या अधिक्षकांविरूद्ध पोलिस कार्यवाही करण्याबाबतचे निवेदन ऑल इंडीया आदिवासी एमप्लॉईज फेडरेशन, नागपूर या आदिवासी संघटनेने माहे मे, २०१७ मध्ये दिले असल्याची बाब खरी आहे.

(२) हे खरे नाही.

कु.विमला भिलावेकर या विद्यार्थीनीस दि.२६.०४.२०१७ रोजी डोकेदुखी व उलट्या यांचा त्रास सुरू झाल्याचे समजताच वसतीगृहाच्या गृहपाल यांनी तिला तात्काळ जिल्हा सामान्य रूग्णालय, अमरावती येथे उपचारासाठी दाखल केले होते. याठिकाणी दि.२८.०४.२०१७ रोजी तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

(३) व (४) सदर मृत्यू प्रकरणी चौकशी करण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, अमरावती; तहसिलदार, धारणी व सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांची चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये कु.विमला भिलावेकर हिच्या मृत्यूसंदर्भात वसतीगृह प्रशासनाकडून हलगर्जीपणा झालेला नसून सदर विद्यार्थीनीस वेळीच रूग्णालयात दाखल करून तिच्यावर उपचार केले असल्याचे व उपचारादरम्यान आजारामुळे नैसर्गिक मृत्यू झाला असल्याचे निष्कर्ष नमूद आहेत.

शासकीय वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांची आरोग्य तपासणी करणे तसेच आजारी असल्यास वेळीच उपचार देण्याबाबत वसतीगृह प्रशासनाकडून वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चोपडा (जि. जळगाव) औद्योगिक विकास केंद्राकरिता जमीनीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) * ९१५१९ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे चोपडा औद्योगिक विकास केंद्राकरिता (मौजे चहार्डी) २०.७५ हेक्टर सरकारी जमीन, ३५.२० हेक्टर खाजगी जमीनीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी दिल्यास तालुक्यातील आदिवासी जनतेस मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन उद्योजकांना उद्योग उभारणीस वाव मिळणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ रोजी मा.उद्योगमंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावास तात्काळ मंजूरी देऊन चोपडा औद्योगिक विकास केंद्र मौजे चहार्डी विकसित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

चोपडा औद्योगिक विकास केंद्रासाठी पाण्याचा स्त्रोत नसल्यामुळे प्रकरण स्थगित ठेवण्यात आले होते. तथापि भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जळगाव

यांनी संपादित क्षेत्रात पाण्याचे स्त्रोत उपलब्ध होईल असे कळविले आहे. परंतु त्या क्षेत्रास पाण्याचा शाश्वत स्त्रोत उपलब्ध झाल्यानंतर औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापुर जिल्ह्यातील आप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांची थकित रक्कम देण्याबाबत

**(४४) * ९०९३५ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापुर) येथील आप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज साखर कारखान्यातील सुमारे २०० कर्मचाऱ्यांची देय रक्कम थकविण्यात आल्याने कर्मचाऱ्यांनी माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील देणी देण्याबाबत साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली लवाद नेमण्यात आला असून वारंवार मागणी करूनही लवादाच्या बैठकी होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रक्कम थकीत राहील्याने कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांची अवेहलना होत असल्यामुळे लवादाची बैठक घेवून देणी भागविण्याबाबत मार्ग काढण्याची मागणी लोकप्रतिनिधी इचलकरंजी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील देणी अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) अप्पासाहेब नलवडे ता. गडहिंग्लज सहकारी साखर कारखाना व मे. ब्रिस्क फॅसिलिटीज पुणे यांचे दरम्यान झालेल्या सहयोग तत्वावरील करारामध्ये ब्रिस्क फॅसिलिटीजने स्विकारलेल्या आर्थिक जबाबदारीमध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकीत देणी रक्कमांचा समावेश करण्यात आलेला नाही. करारानुसार उभय

पक्षामधील वाद न मिटल्यास Arbitration & Conciliation Act १९९६ अन्वये साखर आयुक्त, पुणे यांचेकडे लवाद-दावा दाखल करता येईल, अशी तरतुद आहे. तथापि, करारातील सदर तरतुदी प्रमाणे कारखाना/ मे.ब्रिस्क फॅसिलिटीज पुणे यांनी सेवानिवृत्त कर्मचारी यांचे देय रक्कमेबाबत रितसर लवाद दावा साखर आयुक्तालयाकडे दाखल केलेला नाही.

(३) होय.

(४) करारातील तरतुदीनुसार लवाद दावा दाखल केला नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## निंबोरा बोडखा (ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती) येथे अवैध दारु विक्री होत असल्याबाबत

**(४५) * ८८९३३ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निंबोरा बोडखा (ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती) येथे दारुबंदीचा ठराव गामसभेने केला असूनही मागील ३ महिन्यापांसून अवैध मद्य विक्री होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध दारु विक्रीमुळे गावात शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून याबाबत तक्रार केल्यास तक्रारदारांना मद्य विक्री करणा-यांकडून जीवे मारण्याची धमकी दिली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी यापूर्वीही दारुबंदी असताना खुले आम दारु विक्री करणारे व धमकी देवून गावात दहशत निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक (ग्रा.) अमरावती यांना दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६ च्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार उक्त निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच अवैध मद्य विक्री करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे. निंबोरा बोडखा, ता.धामणगांव रेल्वे, जि. अमरावती येथे अवैध दारू विक्री बंद करण्याबाबत सरपंच / सचिव ग्रामपंचायत निंबोरा बोडखा यांचे ग्रामसभा ठरावासह दि.१६.११.२०१६ चे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईमध्ये दि.२७.२.२०१७ रोजी २ आरोपींना मुद्देमालासह अटक करण्यात येवून त्यांचेवर महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) होय. सरपंच, निंबोरा ग्रामपंचायत यांनी पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) यांना याबाबत दि.१५.१०.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) होय. सरपंच, ग्राम पंचायत निंबोरा बोडखा यांचेकडून दि.१३.१०.२०१६ रोजी संबंधित ठाणेदार, मंगरुळ दस्तगिर यांना निवेदन दिले असून त्याची प्रत पोलीस अधीक्षकांना सादर करण्यात आली आहे.

(४) निंबोरा बोडखा, ता.धामणगांव रेल्वे येथील उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध दारु विक्री करणाऱ्या २ इसमाविरुध्द तसेच पोलीस विभागाकडून ७ इसमाविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिराळा (जि. सांगली) तालुक्यात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या दुर्लक्षामुळे विद्युत तारांना स्पर्श होवून होत असलेले अपघात

**(४६) * ९२१४२ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील मौजे मांगळूर (ता. शिराळा) या गावातील शेतकरी स्व. यशवंत खांडेकर व त्यांच्या पत्नी स्व. पार्वती खांडेकर यांचा शेतात काम करित

असताना विजेच्या तारेला स्पर्श होवून दिनांक २५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास त्यांचा मृत्यू झाला,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिराळा या डोंगरी तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी लोंबकळत असणा-या विद्युत तारा, जीर्ण व गंजलेले लोखंडी पोल यांची वेळेत दुरुस्ती न झाल्याने यापूर्वीही असे अपघात होवून शेतकरी मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबीकडे स्थानिक ग्रामस्थांनी राज्य विद्युत मंडळाच्या कार्यालयाचे लक्ष वेधूनही महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अधिकारी व कर्मचा-यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त घटनेची चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर अपघातास जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच विद्युत मंडळाच्या दोषामुळे नाहक मृत्युमुखी पडलेल्या ग्रामस्थांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) दि. १६/०८/२०१४ रोजी धसवाडी ता. शिराळा येथे विद्युत प्राणांतिक अपघात घडलेला आहे.

(३) व (४) महावितरण U & M योजनेमधून व विभागीय कार्यालयाच्या स्तरावर देखभाल दुरुस्ती अंतर्गत एकूण १४० पोल बदलणे, २५ वितरण पेटी दुरुस्ती व ४०० लोंबकळणाऱ्या तारांची ओढ काढणे ही कामे करण्यात आली आहेत.

सदर अपघातातील मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना तातडीची मदत म्हणून दि.२७/०६/२०१७ रोजी रु.४०,०००/- देण्यात आले असून नुकसान भरपाईची उर्वरित रक्कम देण्याबाबत कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात कृषी पंपासाठी पुरविण्यात येणाऱ्या विजेच्या वेळेत बदल करण्याबाबत**

**(४७) * ८५१४६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे**

**(आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी पंपासाठी देण्यात येणाऱ्या वीज पुरवठ्याच्या वेळेत माहे मे, २०१७ पासून बदल करण्यात येऊन गुरुवार ते रविवारी रात्री साडे दहा वाजता देण्यात येणारी वीज मध्यरात्री दोन वाजता देण्यात येत असल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सप्ताहातील तीन दिवस शेतातच राहावे लागत असल्याचे दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देत असताना साप, विंचवासह हिंस्त्र श्वापदांच्या हल्ल्यामुळे शेतक-यांच्या जिवितास धोका निर्माण झाला असून मध्यरात्री देण्यात येणा-या वीजपुरवठ्याच्या वेळेत तातडीने बदल करण्यात यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी त्याच सुमारास महावितरण कार्यालय, मुंबई तसेच मा.उर्जा मंत्री यांचेकडे लेखी व मौखिक स्वरुपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज पुरवठ्याच्या वेळेत बदल करण्याची कारणे काय आहेत, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दिनांक ५ मे, २०१७ ते १९ मे, २०१७ पर्यंत कृषी पंपाच्या वेळेमध्ये तात्पुरता बदल करुन वीजपुरवठा रात्री १ वा. पासून देण्यात आला होता. दि. २० मे, २०१७ पासून रात्री १० वाजल्यापासून पूर्ववत वीजपुरवठा देण्यात येत आहे.

(२) व (३) माहे मे-२०१७ मध्ये वीजेच्या उपलब्धतेत विविध कारणामुळे अनपेक्षित घट झाली असल्याने वीज पुरवठयाच्या वेळेत बदल करण्यात आला होता व दि. २० मे, २०१७ पासून वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील नर्सिंग महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती रकमेचा केलेला अपहार

**(४८) * ८४८७६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील ८ नर्सिंग महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीमध्ये ३ कोटी ८० लाख रुपयांची अनियमितता केल्याचे विशेष चौकशी पथकाच्या चौकशीत निदर्शनास आल्यानंतर, या संस्थांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश सामाजिक न्याय विभागाने देऊन सदर रक्कम संबंधीत संस्थेकडून वसुल करण्याचे आदेशही दिल्याची बाब दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार कोणकोणत्या संस्थांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असून, कोणत्या संस्थेकडून किती रक्कम वसुल करण्यात आली आहे,

(३) असल्यास,सोलापूर समाजकल्याण विभागात सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीत सुमारे साडेसहा कोटींच्या शिष्यवृत्ती अपहारात अनेक वरिष्ठ अधिकारी सहभागी असल्याची माहिती दिंनाक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती दोषी आसलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय,

(२) संबंधित संस्थांविरुध्द अद्याप गुन्हा नोंद करणेत आलेला नाही. सहायक आयुक्त, समाजकल्याण, सोलापूर यांनी संबंधित संस्थांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, संबंधित संस्थाकडुन वसूलपात्र रक्कम वसुल करण्याची कार्यवाही चालू आहे. त्यापैकी विजयसिंह मोहिते पाटील अकलूज या संस्थेची रु.७५४३०४/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(३) होय,

(४) व (५) या प्रकरणी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी केलेल्या चौकशीत दोषी आढळुन आलेल्या तत्कालीन अधिकारी / कर्मचारी यांचेवर निलंबनाची कार्यवाही झालेली आहे. तसेच सदर बाब न्याय प्रविष्ठ असून, या प्रकरणी पोलीस विभागाकडून गुन्हयाची चौकशी सुरु आहे.

-----------------

**बोरखेडे (ता.चाळीसगांव, जि.जळगाव) येथे बाजार ओट्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४९) * ९२४७५ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरखेडे (ता.चाळीसगांव,जि.जळगाव) येथे बाजार ओट्याच्या कामात ४ लाख ७९ हजार ६६५ रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे चौकशीअंती निष्पन्न झाले असल्याचे दिनांक २४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तत्कालीन सरपंच, ग्रामविकास अधिकारी यांच्यासह तिघे जण दोषी आढळले असून त्यांच्याकडून सदर रक्कम वसूल करण्याचे आदेश पुणे येथील कृषी पणन विभागाच्या नोडल अधिका-यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशानुसार संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय,

(२) होय,

या प्रकरणी ग्रामपंचायत बोरखेडा येथील तत्कालीन सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ठेकेदार, बाजारक्षेत्र अभियंता व कनिष्ठ अभियंता असे एकूण ५ व्यक्ती दोषी आढळून आलेल्या आहेत.

(३) नाही,

या प्रकरणी दोषी आढळून आलेल्या व्यक्तींपैकी बाजारक्षेत्र अभियंता व ग्रामविकास अधिकारी यांचेकडून प्रत्येकी रुपये ९५,९३३/- इतक्या रक्कमेचे धनादेश प्रकल्प कार्यालयाकडे प्राप्त झाले आहेत. तसेच सरपंच, ठेकेदार, कनिष्ठ अभियंता यांचेकडून वसुली रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही.

(४) या प्रकरणी दोषी व्यक्तीवर पोलीस स्टेशन मेहूणबारे, तालुका चाळीसगाव येथे गु.र.क्र.६५/१७ कलम ४०६, ४०८, ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.द.वि.नुसार दिनांक ११.०७.२०१७ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र सरकारने नियमात बदल केल्यामुळे राज्यातील ३०० हून अधिक सौरऊर्जा प्रकल्प अनुदानापासून वंचित राहिल्याबाबत

**(५०) * ८९१४४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने नियमात बदल केल्यामुळे सन २०१५ ते माहे फेब्रुवारी, २०१७ दरम्यान, पूर्व परवानगी न घेतलेले महाराष्ट्रातील ३०० हून अधिक सौरऊर्जा प्रकल्प अनुदानापासून वंचित राहिले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारने नियमात अचानक बदल केल्यामुळे पूर्व परवानगी न घेतलेल्या ३०० सौरऊर्जा प्रकल्पांना अनुदान मिळवून देण्यासाठी शासनाच्या महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट ॲथॉरिटी तर्फे केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने अद्याप कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच उक्त सौरऊर्जा प्रकल्पांना अनुदान मिळण्याकरीता केंद्र सरकारने मान्यता देण्याच्या दृष्टीने राज्य शासनातर्फे केंद्र सरकार बरोबर पत्रव्यवहार तथा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने अद्याप कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप शासनाने याबाबत कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. केंद्र शासनाने नियमात कोणताही बदल केलेला नाही. राज्यामध्ये "Rooftop Solar System" ही योजना दिनांक २३/२/२०१७ रोजी पासून लागू करण्यात आली आहे. केंद्र शासनाने दिनां १/३/२०१७ रोजीच्या सूचनेद्वारे पूर्व परवानगी न घेतेलेल्या कोणत्याही प्रकल्पांना अनुदान देणाऱ्या संस्थेस योजनेतून बहिष्कृत करुन काळया यादीमध्ये टाकण्यात येईल, असे कळविले आहे. त्यामुळे सदर योजना लागू करण्याच्या दिनांका पूर्वीच्या पूर्व परवानगी न घेतलेल्या कोणत्याही प्रकल्पांना पूर्वलक्षित प्रभावाने मंजुरी देण्यात आलेली नाही/देता येत नाही.

(२), (३) व (४) केंद्र शासनाने नियमात कोणताही बदल केला नसल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही. परंतु राज्यातील असे सौर ऊर्जा प्रकल्प अनुदानापासून वंचित राहू नयेत यासाठी दिनांक १०/३/२०१७ च्या पत्रान्वये महाऊर्जाकडून केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. केंद्र शासनाकडून याबाबत अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारच्या सूचना प्राप्त झाल्या नाहीत.

-----------------

**मोताळा (जि. बुलडाणा) येथील ११० शेतक-यांवरील कर्जाची परतफेड न केल्याने मालमत्ता जप्तीच्या केसेस रद्द करणेबाबत**

**(५१) * ८६५९५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा, (जि. बुलडाणा) येथील ११० शेतक-यांनी सन २०११-१२ मध्ये पीक कर्ज व दुग्ध व्यवसायाकरीता नाबार्ड अंतर्गत घेतलेल्या कर्जाची परतफेड न केल्याने जिल्हा सहकारी बँक शाखा मोताळा, जि. बुलडाणा यांनी त्यांचेवर मालमत्ता जप्तीबाबत केसेस दाखल केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सततचा दुष्काळ, पाणी टंचाई व नापीकीमुळे उपरोक्त कर्ज सदर शेतकरी परतफेड करण्यास असमर्थ असल्याने त्यांचेवर दाखल असलेल्या केसेस खारीज करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी मा. सहकार मंत्री यांना दिनांक ०१ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, चौकशीअंती याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उपलब्ध अभिलेखाची तपासणी केली असता सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासनाने शेतक-यांना माफक दरात वीज पुरविण्यासाठी सौर कृषी योजना राबविण्याचा निर्णय घेतला असल्याबाबत**

**(५२) * ९०९५८ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतक-यांना माफक दरात वीज पुरविण्यासाठी दिनांक १ मे, २०१६ रोजीपासून राज्यात सौर कृषी पंप योजना सुरु केलेली असून अहमदनगर जिल्हयात राळेगण सिध्दी आणि यवतमाळ जिल्हयात कोळंबी या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर सौर वीजनिर्मिती करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी १०००० जोडण्याचे उद्दिष्ट ठेवले होते तथापि अद्यापपर्यंत केवळ १७०० जोडण्या झालेल्या असल्याचे माहे मे, २०१७ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अकोला जिल्हयातील १८५ शेतक-यांनी पैसे भरुनही सौर कृषि पंप बसविण्यात आले नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेची योजनेची माहिती शेतकऱ्यांना योग्यरीतीने दिली जात नाही व जोडणीसाठी शेतकऱ्यांना १५००० ते ३६००० रु.रक्कम भरावी लागते व ही रक्कम जास्त असून याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्‌वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, प्रश्न भाग २, ३ व ४ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार उक्त अनामत रक्कम कमी करुन सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे. शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१४/प्र.क्र.२१९/ऊर्जा-७,दि.२७/३/२०१५ नुसार "अटल सौर कृषीपंप योजना" व शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१६/प्र.क्र.३५४/ऊर्जा-७, दि.१४/६/२०१७ नुसार" मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" लागू करण्यात आल्या असून या दोन भिन्न योजना आहेत.

(२) होय. अटल सौर कृषी पंप योजनेतर्गत १०,००० जोडण्यांचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे. या योजनेतर्गत जून -२०१७ अखेर ३०१८ सौरपंप आस्थापित करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही. अकोला जिल्हयातील जून, २०१७ अखेर निवड केलेल्या १२१४ शेतकऱ्यांना सौर कृषी पंपासाठी मागणीपत्रक देण्यात आले असून त्यापैकी ४६५ लाभार्थी शेतकऱ्यांनी आवश्यक रकमेचा भरणा केला आहे. जून २०१७ अखेर ३६४ लाभार्थ्यांच्या शेतात सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत.

(४) हे अंशत: खरे आहे. शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१४/प्र.क्र.२१९/ऊर्जा-७ दि. २७.३.२०१५ मध्ये नमूद अटी व शर्तीनुसार इच्छुक लाभार्थी शेतकऱ्यांनी आवश्यक रकमेचा भरणा करणे आवश्यक आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयात पतसंस्थामधील ठेवीदारांचे १२० कोटी रूपये परत मिळण्याबाबत

**(५३) * ८५१४७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील अवसायनात निघालेल्या ११ पतसंस्थांपैकी १० पतसंस्थानी मूळ कर्जवाटप हे अवैधरित्या व कागदापत्रांशिवाय केल्याचे दिंनाक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त १० पतसंस्थांमध्ये ६० हजार १०३ ठेविदारांचे ११६ कोटी ६५ लाख ३४ हजार रूपये अडकले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील हजारो पतसंस्था अवसायनात निघाल्या असून लाखो ठेविदारांचे करोडो रूपये सदर पतसंस्थांमध्ये अडकले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, पतसंस्थेतील लाखो ठेवीदारांचे करोडो रूपये मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नागपूर जिल्हयातील १० पतसंस्थांमधील ५२,००५ ठेवीदारांच्या रु.५६.०८ कोटी रक्कमेच्या ठेवी परत करावयाच्या आहेत.

(३) व (४) विदर्भातील एकूण २४६ नागरी पतसंस्था अवसायनात घेण्यात आलेल्या असून सदर संस्थांबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियम, १९६१ मधील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) विदर्भातील ३० पतसंस्थाची अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये चौकशी सुरु असून त्यापैकी १६ पतसंस्थांची चौकशी पूर्ण झालेली आहे. सदर १६ संस्थांमधील ३३३ व्यक्तींवर रु. ४२.४४ कोटी इतक्या रक्कमेची जबाबदारी निश्चित केली असून त्यापैकी ३२ व्यक्तींकडून रु. ३७.७० लाख रक्कमेची वसूली करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.